Review Of Research
Vol. 3, Issue. 3, Dec. 2013
Impact Factor 2.1002(UIF)
ISSN:-2249-894X Available online at www. lbp.world

ORIGINAL ARTICLE

# कृषी सिंचन तंत्रामधील कोठारी ॲग्रीटेकचे योगदान : संक्षिप्त अभ्सास

**प्रा. भारत जाधव**
सहयोगी प्राध्यापक, देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ.

## प्रस्तावना :

चंद्रमौळी औद्योगिक वसाहतीमध्ये देश-विदेशात पी. व्ही.सी. पाईप, अलकटिंन पाईप, ठिबक सिंचन साहित्य, स्प्रिंकलर सिस्टीम, एच. डी. ई. पाईप, सेक्शन पाईप, फिटीग्ज केबल यासाठी नाव कमावलेला कोठारी पाईप उद्योग समुह आहे. १२ मे १९९७ रोजी माढा तालुक्यातील उपळाई खुर्द येथील कोठोरी बंधूनी कोठारी पाईप प्रा.लि. मोहोळ हा उद्योग सुरु केला. या वसाहतीमध्ये १२४९७ स्केअर मिटर अशा भव्य जागेवरती हा उद्योग उभा आहे. पाईप तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल रिलायन्स कंपनी, आयपीसीएल, फिनोलेक्स आणि युरोपीयन देशामधून खरेदी केला जातो. या उद्योगसमुहामध्ये तयार झालेला माल तामीळनाडू, राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, आध्रप्रदेश, गुजरात, स्थानिक बजारपेठ, आणि युरोप, ऑस्ट्रोलिया, दक्षिण आफ्रिका इत्यादी देशामध्ये निर्यात केला जातो. केठारी पाईपची उच्च प्रतीचा दर्जा टिकाऊपणा आणि शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सेवा पुरवण्याच्या प्रयत्नामुळे फार मोठया प्रमाणात मागणी आहे.[१]

कोठारी पाईपस् प्रा. लिमीटेड कंपनीमध्ये स्थाई-अस्थाई स्वरुपाचे ५०० कर्मचारी आहेत. त्यामुळे मोहोळ तालुक्यातील पाचशे कुटूंबाचे प्रपंच व्यवस्थित चालतात. कर्मचाऱ्यांना सर्व सुविधा पुरवल्या जातात. कोठारी कामगार वसाहत बांधून त्यांच्या राहण्याची व्यवस्था करुन प्राथमिक स्वरुपाच्या सर्व सुविधा पुरविलेल्या आहेत. काम करीत असतांना कामगारांना इजा झाली तर त्याचा दवाखाना व औषधोपचाराचा पुर्ण खर्च कंपनी करते. एकादा कर्मचारी मयत झाल्यास त्याच्या वारसाना आर्थिक मदत केली जाते. प्रमोद यशवंत कापसे या कर्मचाऱ्याचे निधन झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबाला ५०,००० रुपये मदत दिली. लाला बडेसाब शेख याचे पावसाळयात घर पडले त्यास घरबांधणीसाठी २५,००० रु. मदत दिली. प्रत्येक फ्लॅटच्या सिक्युरिटी ऑफीसमध्ये वैद्यकीय बॉक्सची सुविधा आहे.

कामगारांचा व्यवसाय कर, प्रॉव्हीडंट फंड, कामगार कल्याण योजना, भविष्य निर्वाह निधी, विमा हप्ता, ग्रज्युएटी, सानुग्रह अनुदान, बोनस मेहनताना इत्यादी सर्व सुविधा दिल्या जातात. कर्मचारी ऑफीस स्टाफ ने-आन करण्यासाठी वाहणाची सोय केली असून कामगारांच्या गुणवंत पाल्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहनपर बक्षीसे व आर्थिक मदत केली जाते.

दरवर्षी २७ मार्च रोजी रक्तदान शिबीर आयोजित केले जाते. सर्वरोगनिदान शिबीरे भरविली जातात. सोलापूर जिल्ह्यात कोणत्याही ठिकाणी शेतकरी मेळावा असेल तेथे सहभाग घेतला जातो. शेतकऱ्यांच्या मागणीवरुन त्यांच्या शेतात जाऊन कंपनीच्या अधिकाऱ्यांमार्फत मार्गदर्शन केले जाते. वरील सामाजिक बांधिलकी व उद्योगातील यशाबद्दल अनेक बक्षीसे व पुरस्कार मिळाले आहेत.

१) इंडिया रेडक्रॉस सोसायटी, सोलापूर.(रक्तदान शिबीर २००३-०४)
२) इंडियन रेडक्रॉस सोसायटी, सोलापूर( गोपीकाबाई दमाणी ब्लड बँक, सोलापूर) २००४-०५
३) बिझनेस एक्सप्रेस पुरस्कार-२००४
४) रोटरी क्लब, तासगांव
५) भारतीय उद्योग रत्न पुरस्कार-२००६
६) दक्षिण भारत जैन सभा सामाजिक सेवेबद्दल सन्मानार्थ पुरस्कार-२००६

अशा प्रकारचे अनेक पुरस्कार सामाजिक कार्याबद्दल मिळाल्याने नावलौकिक मिळला आहे.[२] कोठारी पाईपस् प्रा. लिमीटेड कंपनी मोहोळसारख्या निमशहरी भागात सुरू झाल्याने असपासच्या लोकांना रोजगार उपलब्ध झाला. त्यामुळे जवळजवळ ५०० कुटुंबाना आर्थिक लाभ होताना दिसत आहे. या कंपनीचा महसूल चंद्रमौळी औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून मोहोळ ग्रामपंचायतीला जमा होत असल्याने ग्रामपंचायत विकासाला हातभार लागला आहे. शासनाचा महसूल वाढला. त्याचप्रमाणे ट्रान्सपोर्ट उद्योगाला चालना मिळाली. शेतकऱ्यांना स्थानिक बाजार पेठेत पाईप मिळाल्याने खर्चात कपात झाल्याने, कंपनीकडून योग्य मार्गदर्शन मिळाल्याने शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणात होऊ लागले. देशी-विदेशी बाजारपेठेत पाईप निर्यातीमुळे परकी चलनात वाढ झाल्याने देशाच्या विकासात मदत होत असल्याने दिसून येते.

**संदर्भ :**

**१)** ऑफिस रेकार्ड, कोठारी पाईप्स प्रा. लि. मोहोळ, १६ फेब्रुवारी २०१०.
**२)** मुलाखत, शेळके यु. डी. जनरल मॅनेजर, वर्धमान फर्ट्रिलायझर ॲन्ड सिडस् प्रा. लि. कोळेगांव, मोहोळ, ९ जानेवारी २०१०.